लोकमत

# मोबाईल न वापरण्याची मुलांनी घेतली शपथ

**मार्डी :** जिजाऊ ज्ञानमंदिर इंग्लिश मीडियम स्कूल व विजयसिंह मोहिते-पाटील महाविद्यालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील संगणकशास्त्र संकुल, क्विक हिल फाउंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी मुलांनी मोबाईल वापरणार नाही अशी शपथ घेतली. मालती जाधव व सायली शेळके यांनी सेमिनार दिले. यामध्ये आजच्या ऑनलाइन युगामध्ये होणाऱ्या विविध प्रकारच्या फसवणुकीबद्दल उदाहरणाद्वारे माहिती दिली. मोबाईल, कॉम्प्युटर, लॅपटॉप इत्यादी साधनावर अधिकृत अँटीव्हायरसचा वापर करावा. याविषयी मार्गदर्शन केले. यावेळी प्राचार्या सुषमा नीळ उपस्थित होत्या. सूत्रसंचालन अर्चना औरादे तर आभार शीतल कांबळे यांनी मानले.

Hello Solapur
Page No. 2 Sep 01, 2024
Powered by: erelego.com